# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ A 89019 दिनांक : 16/03/2021

## परिपत्रक

**विषय :- कोरोना विषाणू(Covid-१९)जागतिक संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर,IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्पांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना ....**

**संदर्भ :- क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/डी२६६०५ दिनांक १०.१२.२०२०**

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक क्र. ३८७ दिनांक १६.१०.२०२० रोजीच्या बैठकीतील पारित ठराव क्र. ६१२६ नुसार परिपत्रक क्र. डी२६६०५ दिनांक १०.१२.२०२० अन्वये धोरण निर्गमित केले आहे. तथापि सदरहू ठराव बैठक क्र. ३८७ च्या इतिवृतांस पृष्टी देतांना ठराव क्र. ६१३८ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदरहू सुधारित ठरावानुसार महामंडळाचे परिपत्रक क्र. डी२६६०५ दिनांक १०.१२.२०२० मधील अ.क्र. ८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

"ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार(FSI) हस्तांतरण शुल्क १० टक्के ऐवजी ३ टक्के तसेच ३० टक्के ऐवजी १५ टक्के आकारण्यात यावे. सदरहू कंपनीने त्याच्या प्रकल्पात गुंतवणूक केल्याबाबत सनदी लेखापालचे(CA Certificate) प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर हस्तांतरीत कंपनीने त्याच्या प्रकल्पात नमूद गुंतवणूक (२५०० कोटी व त्यापेक्षा जास्त) नमूद कालावधीत केली नाही तर हस्तांतरीत कंपनीस हस्तांतरामध्ये दिलेल्या सूट व्याजासह वसूल करण्यात यावी. सदरहू योजना माहे ३१ मार्च २०२१ पर्यंतच कार्यान्वीत राहील आणि कुठल्याही परिस्थितीत सदर योजनेस मुदतवाढ दिली जाणार नाही."

Data Center इत्यादि करीता ५०० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक आहे परंतु, भूखंडाचे क्षेत्रफळ २०००० चौ.मी. पेक्षा कमी आहे. अशा भूखंडांचे हस्तांतरणानंतरचा वाढीव विकास कालावधी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. तसेच संदर्भिय परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या योजनांचा लाभ देण्याचे/ मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

संदर्भिय परिपत्रकामध्ये इतर कोणताही बदल करणेत आलेला नाही.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.

२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई